RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

वर्ष १०, अंक २०] सोमवार, जुलै २२, २०२४/आषाढ ३१, शके १९४६ [पृष्ठे ४ , किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ९४**

### प्राधिकृत प्रकाशन

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

### उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जुलै २०२४.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७.**

क्रमांक. मदुवआ-०८/२०२१/प्र.क्र.१५३/काम-१०.— महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ ( २०१७ चा महा.६१ ) याच्या कलम ३७ च्या पोट-कलम ( १ ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याव्दारे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम, २०१८ मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता पुढील नियम करीत असून, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ याच्या पोट-कलम ( २ ) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

१. या नियमांस, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२४ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) नियम, २०१८ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य नियम" असा केला आहे) यासोबत जोडलेल्या नमुना-'क' मध्ये, नोंद १३ नंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईलः-

| | | | |
|---|---|---|---|
| "१३ क | आस्थापनेचे विमा प्रमाणपत्र.". | :- | |

३. मुख्य नियमांना जोडलेल्या नमुना-'घ' मध्ये, नोंद १३ नंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईलः-

| | | | |
|---|---|---|---|
| "१३ क | आस्थापनेचे विमा प्रमाणपत्र.". | :- | |

४. मुख्य नियमांना जोडलेल्या नमुना-‘च’ मध्ये, नोंद ११ नंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईलः-

| | | | |
|---|---|---|---|
| “११ क | आस्थापनेचे विमा प्रमाणपत्र.”. | ः- | |

५. मुख्य नियमांना जोडलेल्या नमुना-‘द’ मध्ये नोंद ७ नंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईलः-

| | | | |
|---|---|---|---|
| “७ क | आस्थापनेचा विमापत्र क्रमांक आणि विमापत्राच्या वैधतेचा दिनांक.”. | ः- | |

६. मुख्य नियमांना जोडलेल्या अनुसूचीमध्ये,-

(१) भाग-क मधील, नोंद (क) मध्ये, उप-नोंद(३) नंतर, पुढील उप-नोंद समाविष्ट करण्यात येईलः-

“(३क) आस्थापनेच्या विमा प्रमाणपत्राची प्रत.”;

(२) भाग-ख मधील, नोंद (ख) मध्ये, उप-नोंद (४) नंतर, पुढील उप-नोंद समाविष्ट करण्यात येईलः-

“(४क) आस्थापनेच्या विमा प्रमाणपत्राची प्रत.”;

(३) भाग-ग मधील, नोंद (ग) मध्ये, उप-नोंद (२) नंतर, पुढील उप-नोंद जादा दाखल करण्यात येईलः-

“(३) आस्थापनेच्या विमा प्रमाणपत्राची प्रत.”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**स्वप्निल कापडणीस,**
शासनाचे उप सचिव.

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Government Notification No.MS&EA-08/2021/ C.R.153/Labour-10, dated 22nd July, 2024 published in the *Maharashtra Government Gazette*, Part I-L, Extra Ordinary is hereby published under the authority of Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SWAPNIL KAPADNIS,
Deputy Secretary to Government.

**INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama, Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated 22nd July 2024.

*Notification*

MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENTS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 2017.

No.MS&EA-08/2021/C.R.153/Labour-10.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 37 of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 (Mah. LXI of 2017), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra, hereby makes the following rules further to amend the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Rules, 2018, the same having been previously published as required by sub-section (*2*) of section 37 of the said Act.

1. These rules may be called the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) (Amendment) Rules, 2024.

2. In Form- 'A' appended to the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Rules, 2018 (hereinafter referred to as "the principal Rules"), after entry 13, the following entry shall be inserted, namely :-

| | | |
|---|---|---|
| "13A | Insurance certificate of establishment.". | :- |

3. In Form-'D' appended to the principal Rules, after entry 13, the following entry shall be inserted, namely :-

| | | |
|---|---|---|
| "13A | Insurance certificate of establishment.". | :- |

4. In Form-'F' appended to the principal Rules, after entry 11, the following entry shall be inserted, namely:-

| | | |
|---|---|---|
| "11A | Insurance certificate of establishment.". | :- |

5. In Form-'R' appended to the principal Rules, after entry 7, the following entry shall be inserted, namely :-

| | | |
|---|---|---|
| "7A | Insurance policy number and date of validity of insurance policy of establishment.". | :- |

6. In SCHEDULE appended to the principal Rules,-

(1) in PART-A, in entry (A), after sub-entry (3), the following sub-entry shall be inserted, namely :-

"(3A) Copy of insurance certificate of insurance of the establishment.";

(2) in PART-B, in entry (B), after sub-entry (4), the following sub-entry shall be inserted, namely :-

"(4A) Copy of insurance certificate of insurance of the establishment.";

(3) in PART-C, in entry (C), after sub-entry (2), the following sub-entry shall be added, namely :-

"(3) Copy of insurance certificate of insurance of the establishment.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SWAPNIL KAPADNIS,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.